कौ.हि.म.सं.अर्ज क्र. २८९/२०२३
निशाणी नं.१२.

**<u>अर्जदार यांचा सरतपास शपथेवर वकील श्रीमती. एस.एस.भालेराव यांचेमार्फत-</u>**

३९. मी नि.क्र.१२ वर माझे सरतपासचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

४०. मी कागदयादी नि.क्र.१८ अनुक्र.१ कडे दि. १०.०५.२०२२ रोजी भरोसा सेल येथे दिलेल्या अर्जाची पोहोच अपलोड केली आहे. त्यावर पोलीस आयुक्त कार्यालयाचा शिक्का व संबंधित अधिकाऱ्यांची सही आहे. त्याला नि.क्र. २० देण्यात येत आहे.

४१. मी कागदयादी नि.क्र. १८ अनुक्र. २ कडे मी दि.१०.०५.२०२२ रोजी भरोसा सेल येथे दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र. २१ देण्यात येत आहे.

४२. मी कागदयादी नि.क्र. १८ अनुक्र. ४ कडे मी गैरअर्जदाराला एकूण रु. २,१७,०००/- वेळोवेळी दिल्याच्या गुगल पेचे स्क्रीनशॉट दाखल केले आहेत. त्याला नि.क्र. २२ देण्यात येत आहे.

४३. मी कागदयादी नि.क्र. १८ अनुक्र. ५ कडे गैरअर्जदाराला लग्नामध्ये दीड तोळे सोन्याची चैन दिल्याचे फोटो दाखल केले आहेत. त्याला आर्टिकल अ देण्यात येत आहे.

४४. मी कागदयादी नि.क्र. १८ अनु.क्र. ६ कडे गैरअर्जदाराने मला रस्त्यामध्ये सोडून जातानाचे फोटो दाखल केले आहेत. त्याला आर्टिकल ब देण्यात येत आहे.

४५. मी कागदयादी नि.क्र. १८ अनुक्र. ६ कडे मी व गैरअर्जदारामध्ये झालेल्या चॅटिंगचे स्क्रीनशॉट दाखल केले आहेत. त्याला नि.क्र. २३ देण्यात येत आहे.

४६. मी कागदयादी नि.क्र. १८ अनुक्र. ७ कडे पुरावा कायद्यानुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे. त्याला नि.क्र. २४ देण्यात येत आहे.

४७. मी कागदयादी नि.क्र. १९ अनु.क्र. १ कडे दि. ३०.०४.२०२२ रोजीच्या मिटिंगमधील संवादाचे मोबाईलमधील रेकॉर्डींग हस्तलिखित करुन दाखल केले आहेत व त्याच्या पुष्टयर्थ देखील वरील नि.क्र. २३ चे प्रमाणपत्र दिले आहे. त्याला नि.क्र. २५ देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**
**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.**

समक्ष,

सहि/-
दिनांक : १८/१२/२०२५. (अ.अ.कुलकर्णी)
३ रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.